**<u>न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (लोहमार्ग), मनमाड यांचे न्यायालयात.</u>**
**ठिकाण – मनमाड, जि. नाशिक येथे.**
**(पिठासीन अधिकारी गणेश अ.घुले)**

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला कमांक – / २०१९</u>**
**<u>रेल्वे सुरक्षा बल विरूध्द</u>**

आरोपीने स्व:खुशीने गुन्हा कबुल केलेला आहे. आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. आरोपीचे प्रतिकथन स्वीकारून आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये दोषी ठरविण्यात आले आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने तो गरीब असल्याचे व त्याची आर्थीक परिस्थीती हालाखीची असल्याने व त्याचा पहिलाच गुन्हा असल्याचे सांगून त्याने दयेची याचना केली.

आरोपीने केलेला गुन्हा तसेच आरोपीने ज्या परिस्थीतीमध्ये गुन्हा केलेला आहे त्याचे स्वरूप व आरोपीची आर्थिक परिस्थिती पाहता तसेच रेल्वे अधिनियमातील तरतुदीचा विचार करता विशेष कारण म्हणून आरोपीला कमीत कमी दंडाची शिक्ष करणे योग्य व संयुक्तीक होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपीला रेल्वे अधिनियम १९८९ चे कलम १३७, १४४ या गुन्हाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ प्रमाणे सिध्ददोष धरण्यात येत आहे.

**२.** आरोपीस रूपये ४००/- व रूपये २०० (अक्षरी : सहाशे) इतका दव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास त्याने ४ दिवस साधी कैद भोगावी.

**३.** प्रस्तुत आदेशाची एक प्रत आरोपीस फौ.प्र.संहिता कलम ३६३ प्रमाणे विणामुल्य देण्यात यावी.

**४.** आरोपीने दंडाची रक्कम जमा केल्यास त्यापैकी रक्कम रूपये ..... ही रेल्वे प्रशासनास देण्यात यावी.

आरोपीची आर्थीक परिस्थीती हालाकीची असल्याचे कळविले. यानंतर चांगले वर्तन ठेवण्याचे ते आश्वासीत करत आहेत. सामाजीक सुरक्षीतता धोक्यात येईल असे केल्याचे कथन नाही. त्यांची आर्थीक परिस्थीती लक्षात घेता कमी द्रव्यदंड केला.

स्वाक्षरी/-
(गणेश अंबादास घुले)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
(लोहमार्ग न्यायालय ) मनमाड
जिल्हा नाशीक.
जे.ओ.कोड २५९४.

दिनांक :